IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# एकविसाव्या शतकातील दलित कवितेतील जाणीवा

**प्रा डॉ. जयकुमार चंदनशिवे**
कन्या महाविद्यालय मिरज

**सारांश** (Abstract) : *आधुनिक मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले आहेत त्यामुळे या प्रवाहातून सामाजिक जीवनातील चित्रण साहित्यामध्ये चित्रीत होत गेल्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण दलित स्त्रीवादी आदिवासी साहित्यप्रवाह अस्तित्वात आले यातील दलित साहित्याने इतर साहित्याच्या मानाने आपला वेगळा ठसा मराठी साहित्यामध्ये उमटविला आहे.*

*समाजातील वर्ण व्यवस्थेमुळे अस्पृश्यांना अनेक गोष्टींपासून वंचित ठेवण्यात आले त्यामुळे इतरासारखे जगणे अवघड झाले होते . स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने शिक्षण हेच परिवर्तनाची साधन म्हणून स्वीकारले गेले. समाजात जगत असताना साहित्य संस्कृती सत्ता समानता या क्षेत्रात जाणीवपूर्वक संधी दिली गेली नाही या अन्यायाशी प्रतिबिंब लेखनाच्या माध्यमातून उमटताना दिसते मराठी कवितेत अन्याय आणि अनास्त्याचे चित्रण प्रकर्षाने चित्रीत होऊ लागले दलित कविता ही या साहित्य प्रकाराची सुरुवात होती.*

**की - वर्ड** : एकविसाव्या शतकातील दलित कवितेतील जाणीवा

## I. प्रस्तावना :

आधुनिक मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले आहेत त्यामुळे या प्रवाहातून सामाजिक जीवनातील चित्रण साहित्यामध्ये चित्रीत होत गेल्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण दलित स्त्रीवादी आदिवासी साहित्यप्रवाह अस्तित्वात आले यातील दलित साहित्याने इतर साहित्याच्या मानाने आपला वेगळा ठसा मराठी साहित्यामध्ये उमटविला आहे.

समाजातील वर्ण व्यवस्थेमुळे अस्पृश्यांना अनेक गोष्टींपासून वंचित ठेवण्यात आले त्यामुळे इतरासारखे जगणे अवघड झाले होते . स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने शिक्षण हेच परिवर्तनाची साधन म्हणून स्वीकारले गेले. समाजात जगत असताना साहित्य संस्कृती सत्ता समानता या क्षेत्रात जाणीवपूर्वक संधी दिली गेली नाही या अन्यायाशी प्रतिबिंब लेखनाच्या माध्यमातून उमटताना दिसते मराठी कवितेत अन्याय आणि अनास्त्याचे चित्रण प्रकर्षाने चित्रीत होऊ लागले दलित कविता ही या साहित्य प्रकाराची सुरुवात होती.

## II. उद्दिष्टे:

- दलित साहित्याची पार्श्वभूमी जाणून घेणे
- दलित कवितेमधून व्यक्त झालेले चित्रण यांचा अभ्यास करणे
- 21 व्या शतकातील दलित कविता मधील जाणिवा समजून घेणे.

महात्मा फुले यांनी सांस्कृतिक लढ्याची सुरुवात केली. फुलांच्या विचारातून मानवी समतेची मानवतावादाची भूमिका मांडली गेली. जाती व्यवस्थे खाली दडपलेला माणूस आपली उत्क्रांती कदापि करू शकणार नाही आत्म उन्नतीच्या आड येणाऱ्या समस्या जुगारून दिल्या पाहिजेत असा विचार त्यांनी आपल्या साहित्यातून मांडला. पुढे महात्मा फुले यांच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक कवींनी आपल्या कवितेमधून अन्याय अत्याचार चित्रित केला. त्यापैकी एक कवी म्हणजे शिवराम जानबा कांबळे यांनी तत्कालीन वृत्तपत्रातून निर्भीडपणे लेखन केले तसेच गोपाळ बाबा वलंग कर यांनीही महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य त्यांच्या प्रेरणे प्रभावित होऊन दीनबंधू सुधाकर या वृत्तपत्रातून लेखन केले. 1890 स*** त्यांनी अनार्थ दोष परिहार मंडळी ही संस्था स्थापन करून दलित पीडितांना अन्यायाविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले.


DOI: 10.48175/IJARSCT-37520

ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

विसाव्या शतकातील आंबेडकरी चळवळ या चळवळीला समांतर असा कलात्मक अविष्कार काव्य स्वरूपाने जलसा मध्ये करण्यात आला 1924 ते 1928 या काळात देवराई इंगळे यांच्या कविता उपलब्ध आहेत कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात अस्पृश्य निर्मूलन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**त्यांची एक रचना.**
**बांधवानो आमची अवस्था**
**हीन किती झालेली पाहता**
**असे असूनही स्वस्थच बसता**
**काय म्हणू याला.**

अशाप्रकारे दलित बांधवांच्या मनात जाणीव जागृतीची चेतना निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला त्यांच्या काव्यातून जनजागृतीशी तळमळ दिसून येते दलित कवितेची पूर्वपिटिका पाहिल्यानंतर असे लक्षात येते की महात्मा फुलेंचे साहित्य म्हणजे शूद्रातील शोषणाविरुद्ध पहिला विद्रोही आवाज होता.

21व्या शतकात प्रज्ञा दया पवार ज्योती लांचेवार मायावासनिक सुषमा अंधारे नेहा गोडघाटे आशालाता कांबळे आदिनाथ इंगोले अशोक इंगळे महेंद्र गायकवाड रोहन नागदिवे अविनाश गायकवाड प्रदीप जाधव उत्तम अंभोरे इत्यादी कवींनी आंबेडकरी कवितेला महत्त्वाचे योगदान दिले अरुण काळे यांच्या नंतर आलेले लोक व ग्लोबल गाव खोस या दोन कवितासंग्रहांनी आंबेडकरी कविता समृद्ध केली त्याचबरोबर आंबेडकरी कवितेतील एक महत्त्वाचे कवी म्हणून युवराज सोनटक्के यांच्या 'अग्निशाळा' (२००१) कवितासंग्रहाचा विचार करता येईल. या कविता संग्रहामध्ये युवराज सोनटक्के यांनी राजपत्रित अधिकारी म्हणून काम केले आहे. सोनटक्केची कविता परंपरागत मूल्य व्यवस्थित तोडफोड करताना दिसते .

विषमतेच्या जुलमी वरवंड्याखाली भरडलेले दुःखीतांचे जीवन त्यांनी पिसाळलेल्या लांब दाव्याने खुंटीला टांगून ठेवले. तेव्हापासून माझ्या रक्ताने झालेल्या उग्र आपापसात क्रांतीच्या भाषा बोलू लागल्या .

**ही कविता क्रांतीची भाषा**
**बोलायला भाग पाडते.**

'पोळणाऱ्या सावल्या'(२००१) हा कैलास भाले यांचा कवितासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. या कवितेच्या शीर्षकातूनच आपणास एका दहाकतेचा प्रत्यय कवी करून देतो आणि विरोधाभास सुचित करतो. ही व्यवस्था माणसाला बैलाच्या घाण्यासारखी फिरायला लावते.कवितेत सामाजिक जाणवेचा जीवनानुभव चित्रीत झालेला आहे.' पोळलेल्या सावल्या' मधून मांडलेले वास्तव अस्वस्थ करणारे आहे. या कवितेत वास्तवदर्शी मांगवाडा आणि त्यांच्या जगण्या खूपण्यासह तो चित्रित केला आहे. पोराबाळांना घेऊन गिऱ्हाण मागणारा
मांगवाडा येथे चित्रीत झालेला आहे.
चोरीच्या आळापोटी पोलिसांच्या तपासात
घरातल्या दुरडीत भाकरी सापडल्या म्हणून
गुन्हेगार ठरणारे आम्ही.

गावगाड्याची राखण करणारा हा बाप आणि भाकरीच्या तुकड्याची वाट पाहणारी माय आहे. आपला गावगाडा कोणी हिरावून घेणार नाही ना अशा भीतीने ग्रासलेले मायबाप या कवितेत आहेत.

'काजव्यांच्या खांद्यावर संगिनी'(२००२) महेंद्र गायकवाड यांचा पहिला कवितासंग्रह आहे. कवी म्हणतो कविता ही बंड, क्रांती आणि प्रबोधनाचे एक शक्तीशाली व प्रभावी माध्यम आहे .कष्टावर निष्ठा असणारा हा कवी खाण कामगार आहे .काजव्यांच्या खांद्यावरील संगिनी युद्धाची प्रतीक्षा करत आहे. असा प्रश्न या कवितेच्या शीर्षकातून उपस्थित होताना दिसतो. या कवितेतून अस्वस्थ वर्तमानाचे प्रतीकात्मक चित्र कवीने रेखाटलेले आहे. संवेदनशून्य सत्ता व्यवस्थेच्या रोमारोमात विणलेली असल्यामुळे माणुसकीची जाणीव हद्दपार होताना दिसते .तेव्हा पुरोगामी म्हणून घेणारी सरकारे किती निर्दयी आणि कुरुर आहेत याचा प्रत्यय येतो.

आपली माती संवेदना शून्य झाली
तेव्हापासून पुरोगामी सरकार बुलडोझर फिरवण्याचा आदेश देताहेत.
उध्वस्त करताहेत मोडक्या देहाच्या झोपड्या

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

उभारत आहेत गगनचुंबी इमारती
त्यांना हिरवे स्वच्छ सुंदर शहर हवे आहे.

स्वच्छ सुंदर शहराच्या निर्मितीसाठी झोपड्या जमीन उध्वस्त केल्या जात आहेत. माणसांचे स्थलांतर केले जाते आहे. शोषण आणि दमणाच्या विरोधात मोर्चे काढणाऱ्या संघटना विकत घेतल्या. चळवळी मोडीत काढणारी ही व्यवस्था माणसांची खरेदी करून त्यांचे जगण्याचे प्रश्न कायम तसेच ठेवत आहेत.

'युद्धपक्षी'(२००४) या दशकातील एक अत्यंत महत्त्वाचा कवितासंग्रह म्हणून अशोक रा. इंगळे यांच्या कवितेचा उल्लेख करता येईल. या कवितासंग्रहातील कविताही करुणेने ओतपोत भरलेली असून ही करुणा बुद्धाची आहे. त्यामध्ये डॉ.बाबासाहेबांचा विचार आहे. मानवमुक्तीचे क्रांती गीत हे'युद्ध पक्षी'या कवितासंग्रहाचे मुख्य प्रयोजन आहे संघर्षातून जन्माला आलेल्या या कवितेने समाजातील जिवंत माणसावर प्रेम करायला शिकवले या कवितेची सामान्य माणसाच्या मनात असणारी खदखद त्यास मोकळी वाट करून देण्यासाठी इथला आसमंत पेटून उठला पाहिजे असे अपेक्षा कमी करताना दिसतो.

मी निळ्या नदी सप्तरंगी ध्येयाची लेणी कोरतो आहे
उद्याच्या सूर्यकुलातील परिवारासाठी
मार्गाला महामार्ग जोडण्यासाठी माझी प्रज्ञा धडपडते आहे.

गतकाळाचे भान ठेवून नव्या शतकाला सामोरे जाण्यासाठी तावून सुलाखून तयार असलेली कवींची जाणीव ही पोकळतत्त्वज्ञान सांगणारी नाही तर जाणिवेने समकालीन जीवनातील वास्तवाचा सांस्कृतिक मानसिकतेचा आणि सामाजिक उदासीनतेचा शोध घेण्याचा प्रयत्न कवी करतात .

महेंद्र भवरे यांच्या 'महा सत्तेचे पीडादान'(२००५) या काव्यसंग्रहाणे जागतिकीकरणाचा समाज जीवनावर कशा पद्धतीने परिणाम झाला हे आपल्या कविता मधून चित्रित केला आहे त्यांनी आपला तीव्र निषेध शब्दात न व्यक्त करता प्रतिमा प्रतीकांच्या सहाय्याने तो व्यक्त केला आहे मल्टीनॅशनल हात, फायबर ग्लासातून सायबर न्याहाळणारी नजर या ओळी मधून जागतिकीकरणाचा वेध घेतला आहे. मानवी जीवन सु व्यवस्थित व्हायला पाहिजे म्हणून मानवाने अनेक व्यवस्था निर्माण केल्या आहेत यात चिंतनाच्या तत्त्वज्ञानाच्या प्रत्यक्ष आश्नावर नियंत्रण ठेवणाऱ्या सामाजिक व्यवस्थेपर्यंत माणूस हाच केंद्रबिंदू आहे.

माणुसकीचे छप्पर गेले आसमंतात उडून
मूल्यांचे खग्रास ग्रहण मागत सुटलेय दान
भिकारचोट कराराच्या चौकटीवर चौकट झाली या खिळीखिळी

नैतिकतेची व्यवस्था कशी कोलमडले आहे हे कविते व्यक्त करताना दिसतो.

## III. सारांश

1960 नंतरच्या काळात दलित साहित्याचा उदय झाला. दलित साहित्याने मराठी साहित्य ढवळून काढले .दलित साहित्याने जी भरारी घेतली आहे त्यामुळेच दलितांच्या व्यथा, वेदना व विद्रोहाचे जळजळीत शब्दांच्या आधारे लेखन करून जातीव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले गेले .शतकानु शतके अंधारात आणि अज्ञानात जीवन जगणाऱ्या दलितांना ज्ञानाचा प्रकाश दाखवून त्यांच्यातील अस्मिता जागृत करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आणि त्याच विचाराने भारावलेल्या दलित लेखकांनी त्यांच्या लेखणीतून अखिल भारतीय साहित्य विश्व ढवळून काढले. कथा, कादंबरी, कविता ,आत्मकथन यासारख्या वाङ्मय प्रकारातून दलित लेखकांनी आपले जळजळीत विचार मांडले. दलित साहित्याचा आत्तापर्यंतचा प्रवास बघितला तर पहिल्या पिढीने वेदना दुसऱ्या पिढीने विद्रोह आणि तिसऱ्या पिढीचा मानवतावाद अशाप्रकारे दलित साहित्य विकसित होत गेले आहे .

दलित साहित्याचे विद्रोह हे मुख्य शस्त्र आहे. दलित साहित्य हे वेदनेच्या जाणिवेतून जन्माला आलेले साहित्य आहे .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सम्यक क्रांतीतून विद्रोह जन्माला आला आणि हाच विद्रोह स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार करणारा ठरला. दलित कवितेमधून अनेक कवींनी आपल्या व्यथा, वेदना व्यक्त केले आहेत. खरं म्हणजे दलित साहित्याचा संघर्षच मुळात माणसाला माणूस म्हणून न स्वीकारणाऱ्या प्रवृत्ती विरुद्ध आहे. म्हणून दलित कवींनी आपल्या साहित्यातून माणसाला केंद्रस्थानी मानून त्याचा विचार पाना-पनात मांडला आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

एकविसाव्या शतकातील जागतिकीकरणाच्या समाज जीवनावरील अनिष्ट परिणामाची जाणीव या शतकातील कविता मधून दिसून येते .डॉ. आंबेडकरांच्या विचारामुळे अभिव्यक्तीचे साधन आणि सामर्थ्य प्रकट करणारी जाणीव आत्मभानामुळे आलेली दिसून येते. विद्रोहाच्या निर्मितीचे हे एक कारण आहे .मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी हा विद्रोह महत्त्वाचा ठरला आहे. भारतीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर झाले नाही. ही खंत अनेक कवितांमधून प्रकट झालीआहे. त्यामुळे लोकशाही पूर्वकाळात जसे धर्म, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था पुरोहितशाही इत्यादी शोषक केंद्र होती तसेच आणि शोषित अशी वर्गवारी भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पहावयास मिळते. भारतीय समाजात आज समकालीन जीवनात कामगार, कष्टकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, भूमीहीन हे सारे घटक आजही भरडताना दिसतात .कारण येथे वर्ग हा जातीच्या कचाट्यातून अद्यापही बाहेर पडलेला नाही. समकालीन सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रामध्ये गरीब माणूस कुठे असेल, ग्लोबल व्यवस्थेत तो कुठे कुठे असेल, त्याच्या संघर्षाचे तत्त्वज्ञान काय असेल. या प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न दलित कवितांमधून केलेला दिसतो

## संदर्भ

१) पाणतावणे गंगाधर, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, १९७६.
२) किरवले कृष्णा, आंबेडकरी शाहिरी: एक शोध, नालंदा प्रकाशन, १९९२.
३) भगत दत्ता, दलित साहित्य, य.च.म.मु. विद्यापीठ, १९९२.
४) जाधव रा. ग, निळी पहाट, श्री विद्या प्रकाशन, पुणे १९७५.
५) चंदनशिवे सुनील, मराठी दलित कविता, डिंपल प्रकाशन, २००५.
६)'सोनटक्के युवराज, शाश्वत प्रकाशन बेंगलूर,२००१
७) भाले कैलास, मैत्र प्रकाशन २००१
८) गायकवाड महेंद्र, शब्द मित्र प्रकाशन, २००२.
९) इंगळे अशोक, प्रज्ञा प्रकाशन, पातूर २००४
९) भवरे महेंद्र, अभिधानंतर प्रकाशन, मुंबई.२००५.
१०) भगत सिद्धार्थ, निनाद प्रकाशन'यवतमाळ २००६ सून येतो.